लोकमत

## प्रथम वर्षाचे निकाल : मर्यादित मनुष्यबळावर काम सुरु

# शिवाजी विद्यापीठाचे सहा दिवसांत ४० निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : गेल्या सहा दिवसांत शिवाजी विद्यापीठाने विविध अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचे ४० निकाल जाहीर केले आहेत. कोरोनामुळे मर्यादित मनुष्यबळावर परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे निकाल लावण्याचे काम सुरु आहे.

कोरोनामुळे यावर्षी प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या परीक्षा झाल्या नाहीत. त्याऐवजी मागील सत्रांतील गुणांवर सरासरी गुण देऊन प्रथम, द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी कॅरिफॉरवर्ड करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत. त्यानुसार विद्यापीठाने दि. २१ ऑगस्टपासून निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. त्यात बुधवारपर्यंत प्रथम वर्षाचे ४० निकाल ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्यात आले आहेत.

त्यात बी.ए., बी.कॉम., बी. एससी., एमएसडब्ल्यू, एमबीए, एम. टेक. बी. एससी (कॉम्प्युटर सायन्स, आयटी, शुगर टेक), एम. ए. (योगा, गृहशास्त्र), बी. एड्., एम. एड्., बीपीएड्., तीन आणि पाच वर्षे लॉ, डी. फार्मसी, एम. फार्मसी. बी. टेकसह काही बी. व्होक. अभ्यासक्रमांचा समावेश आहे. प्रथम आणि द्वितीय वर्षाचे मिळून एकूण २२५ निकाल टप्प्याटप्प्याने जाहीर केले जाणार आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठात १५ टक्के उपस्थितीचा नियम आणि रोटेशननुसार कर्मचारी कामावर येत आहेत.

परीक्षा व मूल्यमापन मंडळातही या पद्धतीने कार्यवाही सुरु आहे. परीक्षा आणि निकालाचे कामकाज पाहणाऱ्या एक अधिकारी, कर्मचाऱ्याला कोरोनाचा सामना करावा लागला आहे. अशा स्थितीत आवश्यक ती दक्षता घेऊन निकाल लावण्याचे काम सुरु असल्याचे या मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी बुधवारी सांगितले.

### कॉम्बिनेशन, रिपीटर, एटीकेटीचे निकाल दुसऱ्या टप्प्यात

- नियमित (फ्रेश) विद्यार्थ्यांचे निकाल पहिल्या टप्प्यात जाहीर करण्यात येत आहेत. शासनाने निश्चित करुन दिलेल्या सूत्रांनुसार निकाल लावण्याचे काम मॅन्युअल पद्धतीने करावे लागत आहे. काळजीपूर्वक निकाल जाहीर करण्यात येत असल्याचे पळसे यांनी सांगितले.
- सत्र (सेमिस्टर) एक, तीन आणि पाचचे निकाल लवकरच जाहीर होतील. कॉम्बिनेशन (पहिल्या सत्रातील काही विषय राहिले असल्यास), पुनर्परीक्षार्थी आणि एटीकेटीधारकांचे निकाल दुसऱ्या टप्प्यात जाहीर केले जाणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कोणतीही शंका मनात बाळगू नये, असे आवाहन पळसे यांनी केले आहे.



१,४५,000
विद्यार्थीसंख्या
५,000
अंतिम वर्षाचे विद्यार्थी

### आकडेवारी दृष्टिक्षेपात

प्रथम, द्वितीय वर्षाचे एकूण जाहीर होणारे निकाल : २२५




### बॅकलॉगबाबतच्या निर्णयाची प्रतीक्षा

अंतिम सत्रातील परीक्षेसाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या ७५ हजार आहे. त्यातील ४५ हजार विद्यार्थी हे नवीन, तर सुमारे २५ हजार विद्यार्थी हे बॅकलॉगमधील आहेत. त्याबाबतची माहिती विद्यापीठाने गेल्या दीड महिन्यापूर्वी शासनाला सादर केली आहे. बॅकलॉग विद्यार्थ्यांच्या निकालाच्या प्रक्रियेबाबत विद्यापीठाला शासन आदेशाची प्रतीक्षा लागली आहे.

Kolhapur Main
Page No. 3 Aug 27, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

# सीएचबीधारकांना मुदतवाढ द्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महाविद्यालयांतील गेल्याबर्षीच्या तासिका तत्त्वाबरील प्राध्यापकांना (सीएचबीधारक) मुदतवाढ द्यावी; ऑनलाईन शिक्षण प्रक्रिया राबविण्याबाबत मार्गदर्शन करावे; प्रलंबित असणारे निकाल तातडीने जाहीर करावेत, अशा विविध मागण्या शिवाजी विद्यापीठ प्राचार्य असोसिएशनने मंगळवारी केल्या. याबाबत असोसिएशनच्या शिष्टमंडळाने प्रभारी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांच्याशी चर्चा केली.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील बहुतांश महाविद्यालयांमध्ये ६० टक्के प्राध्यापक हे सीएचबीधारक आहेत. कोरोनाच्या सध्याच्या स्थितीत सीएचबीधारकांच्या नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण शक्य होणार नाही. त्यामुळे गेल्या वर्षी महाविद्यालयांमध्ये कार्यरत असणाऱ्या सीएचबीधारकांना मुदतवाढ द्यावी. महाविद्यालये सुरु होण्याची अजून चिन्हे नाहीत. त्यामुळे विद्यापीठाने प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या पात्रतेची प्रक्रिया पूर्ण करण्यास मुदतवाढ द्यावी. ऑनलाईन शिक्षण कशा पद्धतीने द्यावे, याबाबत मार्गदर्शन करावे. एम.फिल.ची अट पूर्ण केलेल्या; पण ती काढण्यासंदर्भातील प्रक्रिया ज्या प्राध्यापकांनी पूर्ण केली त्याबद्दल संबंधित महाविद्यालयांनी दंड भरण्याचा विद्यापीठाचा आदेश चुकीचा असून, त्यामध्ये सुधारणा करावी, अशी मागणी या शिष्टमंडळाने केली. यावेळी प्राचार्य असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील, डी. आर. मोरे, सुरेश गवळी, युवराज भोसले, प्रवीण चौगुले, मंगलकुमार पाटील, नंदकुमार शहा, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी परीक्षा नियंत्रक गजानन पळसे, आदी उपस्थित होते.

## मुदतवाढीचा प्रस्ताव शासनासमोर मांडणार

सीएचबीधारकांच्या मुदतवाढीचा प्रस्ताव शासनासमोर मांडण्यात येईल. पात्रतेच्या प्रक्रियेची मुदत वाढविली जाईल. ऑनलाईन शिक्षणाबाबत समिती स्थापन केली असून, लवकरच महाविद्यालयांना मार्गदर्शन केले जाणार आहे. एम.फिल.च्या अटीबाबतच्या आदेशात सुधारणा करण्यात येईल, असे प्रभारी कुलगुरु डॉ. करमळकर यांनी सांगितले आहे, अशी माहिती डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी दिली.